||संस्कृती रक्षतिः स्त्री शक्तिः||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा

ता.चोपडा, जि.जळगांव

स्थापना वर्ष-१९९४



# वार्षिक अहवाल

## वर्ष २०१९-२०


सुंदरगढी, चुंचाळे रोड,ता.चोपडा,

जि.जळगांव

फोन नं.०२५८६-२२३०१७

Website - www.bmcswchopda.org e-mail- bmcsw.chopda@gmail.com

॥ संस्कृती रक्षतिः स्त्री शक्ति ॥

भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव

## सन 2019-20 मधील कार्यक्रमांचा थोडक्यात अहवाल

### दिनांक- 21 जुन, 2019- आंतरराष्ट्रीय योगा दिवस-

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयात आंतराराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने संपन्न झाला. या कार्यक्रमास संस्थेच्या सहसचिव सौ.अश्विनीताई गुजराथी, उपाध्यक्षा सौ.छायाताई गुजराथी, सौ.मनिषाताई पाटील, प्राचार्य,डॉ.ईश्वर सौंदाणकर, प्रा.आशिष गुजराथी, आय.टी.आय. विभागाचे प्राचार्य श्री.उदय ब्रम्हे तसेच नगर परिषद चोपडा येथील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.राहूल निकम यांनी योगविषयीची माहिती व उपयुक्तता उपस्थितांना दिली. विविध प्रकारची योगासनांची प्रात्यक्षिके स्वतः करुन दाखविली व योगाचे महत्व सांगून उपस्थितांकडून करुन घेतली. सौ.छायाबेन यांनी देखील काही आसनांची माहिती करुन दिली.



या कार्यक्रमाबाबत सौ.अश्विनीताई गुजराथी यांनी समाधान व्यक्त केले आणि योगासन नियमितपणे केली जावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.आशिष गुजराथी, रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.मोहिनी उपासनी यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी विकास विभागाचे अधिकारी डॉ.संबोधी देशपांडे व प्रा.शैलेश पाटील यांनी सहकार्य केले. आभारप्रदर्शन डॉ.मोहिनी उपासनी यांनी केले. योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारीवृंद उपस्थित होते.

### दिनांक- 26 जुन, 2019- छत्रपती शाहु महाराज जयंती-

छत्रपती शाहू महाराज जयंती दिनानिमित्त राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाकडून करण्यात आले होते. या प्रसंगी राजश्री शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेच्या सहसचिव सौ.अश्विनीबेन गुजराथी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.राहुल निकम, प्रा.आशिष गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी शाहू महाराजांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.या प्रसंगी महाविद्यालयाच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



या प्रसंगी संस्थेच्या सहसचिव अश्विनीबेन गुजराथी, प्राचार्य, ईश्वर सौंदाणकर, प्रा.आशिष गुजराथी, रासेयोचे प्रा.डॉ.राहुल निकम यांच्या सह प्रेरणा मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ.संजय चौधरी, संस्थेच्या विविध विभागाचे सर्व कर्मचारी समाजकार्य महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दिनांक- 08 जुलै 2019- वृक्षदिंडीचे आयोजन-**

समाजकार्य महाविद्यालय व हरीत सेना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण



करण्यात आले. या कार्यक्रमात माजी विधानसभा अध्यक्ष मा.श्री.अरुणभाई गुजराथी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी चोपडयाचे तहसिलदार मा.अनिल गावित, चोपडा साखर कारखान्याचे चेअरमन मा.अतुलभाऊ ठाकरे, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा.जगन्नाथ काका,चोपडा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा.मनिषाताई चौधरी, गटनेते जीवनभाऊ चौधरी, चोपडा पिपल्स बॅंकेचे चेअरमन मा. चंद्रहासभाई गुजराथी व संचालक मा. सुभाषभाई गुजराथी, मा.मोरेश्वर देसाई, संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनम गुजराथी, उपाध्यक्षा सौ.छायाबेन गुजराथी, चोपडा रोटरीक्लबचे अध्यक्ष मा.नितीनभाई जैन, सेक्रेटरी मा.धिरजभाई अग्रवान, चोपडा शहर पोलीस निरीक्षक श्री. विनायक लोकरे, वनविभागाचे फॉरेस्ट ऑफीसर पाटील साहेब, मा.आशिषभाई गुजराथी, आयटीआय विभागाचे प्राचार्य, श्री उदय ब्रम्ही, प्रेरणा मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजय चौधरी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक- 01 जुलै, 2019- बी.एस.डब्ल्यू प्रथम वर्ष अभ्यासक्रम प्रवेशाची प्रथम यादी प्रकाशीत**

प्रथम वर्ष F.Y.B.S.W. या अभ्यासक्रमाच्या 2019-20 प्रवेशासाठी प्रथम फेरीसाठीची गुणवत्ता यादी प्रकाशीत करण्यात आली.

**दिनांक- 13 जुलै 2019- प्रवेश पुर्व परीक्षा**

विद्यापिठातर्फे शैक्षणिक वर्ष 2019-20 साठी एम.एस.डब्ल्यू प्रथम वर्ष या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची Entrance Exam घेण्यात आली.

**दिनांक- 09/08/2019- जागतीक आदिवासी दिन-**



**व्याख्यान-** जागतीक आदिवासी दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.पी.एस.पाडवी, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चोपडा यांनी आदिवासी संस्कृती व इतिहास या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमास महाविद्यालयाचे

प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दिनांक- 15 ऑगस्ट,2019- सांगली, कोल्हापुर येथील पुरग्रस्थांना मदतीसाठी पथक रवाना-**




समाजकार्य महाविद्यालय, आय.टी.आय.चोपडा व नर्सिंग महाविद्यालय यांच्या संयुक्त मदतीने सांगली, कोल्हापुर येथे महापुरामुळे झालेल्या नुकसान ग्रस्तांच्या मदतीसाठी मदत पथक रवाना करण्यात आले. या पथकात वैद्यकीय(नर्सिंग), इलेक्ट्रीशीन, समाजकार्य करणारे विद्यार्थी होते. त्यांच्या सोबत धान्य, कपडे, औषधी रोख रक्कम इ. मदत देण्यात आली. मदत पथकाला हिरवा झेंडा दाखविण्यासाठी कार्यक्रमास मा.अरुणभाई गुजराथी, मा.तहसिलदार, मा.जगदीश वळवी, मा.चंद्रहासभाई संस्थेच्या अध्यक्षा सौ.पुनम गुजराथी व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दिनांक- 23 ते 25 ऑगस्ट, 2019- साहस शिबीर-**



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमान दि.23 ते 25 ऑगस्ट, 2019 या कालावधीत साहस शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर आयोजन शासकीय आश्रमशाळा, देवझीरी, ता.चोपडा येथे घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ.किशोर पाठक, प्राचार्य, पंकज महाविद्यालय चोपडा हे उपस्थित होते. अध्यक्षा म्हणून डॉ.पुनम गुजराथी, तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.पवन पाटील, समन्वयक, जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी हे उपस्थित होते. या शिबीराब विविध महाविद्यालयातील एकुण 136 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

**दिनांक-05 सप्टेंबर, 2019 - शिक्षक दिन व प्रेरणा पुरस्कार वितरण कार्यक्रम-**



5 सप्टेंबर, 2019 रोजी शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सौ.पुनम गुजराथी,अध्यक्षा,भगिनी मंडळ तर प्रमुखअतिथी म्हणून श्री सुधाकर केंगे,निवृत्त मुख्याध्यापक, प्रा.राजेंद्र महाजन, प्राचार्य, ललित कला महाविद्यालय उपस्थित होते. यावेळी स्व.विमलबाई विनायक देशमुख व विनायक केशव देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ खालिल प्रेरणा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

1) धनगर उज्वला लिलाधर- टी.वाय.बी.एस.डब्ल्यू.परीक्षेत विद्यापीठात प्रथम

2) ईधे राजश्री दिलीप- टी.वाय.बी.एस.डब्ल्यू.परीक्षेत विद्यापीठात द्वितीय

1) चौधरी सपना प्रल्हाद- एम.एस.डब्ल्यू.द्वितीय वर्ष प्रथम क्रमांक

2) पाटील अश्विनी सुपडू - एम.एस.डब्ल्यू.द्वितीय वर्ष द्वितीय क्रमांक

**दि. 9 सप्टेंबर, 2019- Campus Interview आयोजन-**




महाराष्ट्र शासन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी बेंचमार्क सर्वेक्षणासाठी भरावयाच्या समन्वयक पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीसाठी श्री.भुषण रतन गंगाधर, संशोधन सहा, पुणे, श्री.संजय कोळी, गृहपाल, शासकीय वसतीगृह चोपडा, प्रा.आशिष गुजराथी, प्रा.अनंत देशमुख, श्री गणेश चिंचकर, संशोधक सहा,पुणे यात महाविद्यालयाच्या एकूण 48 विद्यार्थ्यांच्यामुलाखती घेण्यात आल्या.

**दिनांक- 14 सप्टेंबर,2019 - क्रॉस कन्ट्री स्पर्धा सहभाग**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आयोजित क्रॉस कन्ट्री क्रीडा स्पर्धा पंकज महाविद्यालय चोपडा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. यात महाविद्यालयातील खालिल विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

1) पावरा कालुसिंग चमारसिंग TYBSW
2) भिल अजित दित्या- FYBSW
3) देशमुख दिक्षांत रमेश- FYBSW
4) वळवी सचिन अमरसिंग-SYBSW
5) पावरा पल्लवी फाफला- SYBSW
6) पाडवी अंजली रेल्या- SYBSW
7) वळवी वंदना राजेंद्र- SYBSW

संघप्रमुख-प्रा.नारसिंग वळवी

**दिनांक- 24 सप्टेंबर,2019 - राष्ट्रीय सेवा योजना दिवस**




राष्ट्रीय सेवा योजना 50 वा वर्धपन दिनानिमित्त माचले ता.चोपडा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात गावात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात ग्रामस्वच्छता, स्वच्छतेची शपथ प्लॉस्टीक वापरावर बंदी, मतदान जागृती इ. विषयावर गावातील नागरीकांना प्रबोधन करण्यात आले. या कार्यक्रमास विभागीय समन्वयक डॉ.किशोर पाठक, डॉ.विलास पाटील, फि.प.शाळेचे मुख्याध्यापक, सरपंच कोकीळाताई, उपसरपंच संतोष पाटील, ग्रामसेवक, भाऊसाहेब देवरे हे उपस्थित होते.

**दिनांक- 27 सप्टेंबर,2019 - मतदान जनजागृती-**

पंचायत समिती चोपडा यांचेमार्फत महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान व प्रतिज्ञा ग्रहण

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात श्री.युवराज पाटील, समन्वयक, शिक्षण विभाग, पंचायत समिती चोपडा यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचेकडून मतदानाची प्रतिज्ञा ग्रहण करुन घेतली. तसेच नविन मतदार नोंदणी फॉर्म नं.6 वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात आले.



**दिनांक- 3 व 4 ऑक्टोबर, 2019 - विद्यार्थी साहित्य संम्मेलन सहभाग**

कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव मार्फत पहिले साहित्य संम्मेलन हे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव येथे आयोजित करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयातील खालिल विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 1) भोये दिपाली सुरेश- SYBSW, 2) कोळी रुपाली रामचंद्र- TYBSW 3) बाबर मनोज उत्तम- TYBSW 4) पावरा कालुसिंग चमारसिंग-TYBSW

**दिनांक - 01/11/2019 पासून बी.एस.डब्ल्यू. या अभ्यासक्रमाच्या विद्यापीठाच्या ऑक्टो/नोव्हे- परीक्षा**

**दिनांक - 20/11/2019 पासून एम.एस.डब्ल्यू. या अभ्यासक्रमाच्या विद्यापीठाच्या ऑक्टो/नोव्हे- परीक्षा**

**दिनांक- 02 ऑक्टोबर,2019 - महात्मा गांधी जयंती व लाल बहाद्दुर शास्त्री जयंती -**

महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती व लाल बहाद्दुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विशेष सन्माननीय अतिथी म्हणून श्री.सुनिल चौधरी, मुख्याध्यापक, महिला मंडळ माध्यमिक विभाग, व श्री.अरुणभाई संदानशिव, मुख्याध्यापक, प्राथमिक विद्या मंदिर हे उपस्थित होते.

**दिनांक-26 ऑक्टोबर, 2019:- स्व.डॉ.सुशिलाबेन शाह यांचा द्वितीय स्मृती दिन-**



स्व.डॉ.सुशिलाबेन शाह (जिजी) यांच्या द्वितीय स्मृती दिनानिमित्त विनम्र भावभूर्ण आदरांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम त्यांच्या समाधिस्थळी घेण्यात आला. या कार्यक्रमास बाबाजी परिवारासह मा.अरुणभाई गुजराथी, संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनमबेन गुजराथी, मा.अश्विनिबेन संस्थेचे सर्व विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक-26 नोव्हेंबर, 2019:- संविधान दिन**



समाजकार्य महाविद्यालयात दि.26/11/2019 रोजी संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन त्यांना सुमनांजली अर्पण करण्यात आली. प्रा.डॉ.राहुल निकम यांनी त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त

करुन संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी संविधानाचे महत्व समजावून सांगितले.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक-30/11/2019:-महावॉक रॅली**




भगिनी मंडळ चोपडा संस्थेमार्फत महावॉक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत संस्थेतील सर्व विभाग सहभागी झाले होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ.पुनम गुजराथी, सहसचिव,सौ.अश्विनी गुजराथी तसेच सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी सह उपस्थित होते. रॅलीमार्फत पर्यावरण बचाव, वृक्ष लागवड, स्वच्छता, इ.विषयी जनजागृती करण्यात आली.

**दिनांक-05 ते 10 डिसेंबर, 2019:- हिवाळी ग्रामीण शिबीर- मंगरुळ, ता. चोपडा**




समाजकार्य महाविद्यालयातील समाजकार्य स्नातक भाग- 1 व समाजकार्य पारंगत भाग- 1 या वर्गाचे क्षेत्रकार्य अभ्यासक्रमांतर्गत ग्रामीण शिबीर दि.05 ते 10 डिसेंबर 2019 या कालावधीत घेण्यात आले शिबीराचे आयोजन जिल्हा परिषद शाळा मंगरुळ ता. चोपडा येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.भावना भोसले, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती चोपडा यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सौ.पुनम गुजराथी या उपस्थित होत्या. या ग्रामीण शिबीरात विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. यात 1) आरोग्यसंवर्धन, ग्रामविकास 2) ग्रामस्वच्छता अभियान 3) श्रमसंस्कार 4) बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान इ. कार्यक्रम घेण्यात आले.ग्रामीण शिबीराचे संयोजन म्हणून प्रा.आशिष गुजराथी .डॉ.व्ही.ए.रायपुरे, प्रा.डी.जी.भागवत, डॉ.आर.वाय.निकम. डॉ.मोहिनी उपासनी यांनी काम पाहिले.

**दिनांक- 5 ते 19 डिसेंबर 2019:- शैक्षणिक सहल**




महाविद्यालयातील TYBSW या अभ्यासक्रमाची संस्थाभेटी (शैक्षणिक सहल) दि.5 ते 19 डिसेंबर 2019 या कालावधीत घेण्यात आली. या शैक्षणिक सहलीत पुणे व नगर येथील संस्थांना भटी देण्यात आल्यात. स्टडी टूरचे संयोजक म्हणून प्रा.शैलेश पाटील व डॉ.संबोधी देशपांडे यांनी काम पाहिले.

**दिनांक- 11 ते 18 डिसेंबर, 2019:- शैक्षणिक सहल**

महाविद्यालयातील MSW-II या अभ्यासक्रमाची संस्थाभेटी (शैक्षणिक सहल) दि.11 ते 18 डिसेंबर, 2019 या कालावधीत घेण्यात आली. या शैक्षणिक सहलीत राजस्थान येथील चितोरगढ, उदयपूर, नाथद्वार, कुंभलगड, पुष्कर, अजमेर, जयपूर येथील विविध संस्थांना भेटी देवून अभ्यास करण्यात आला. स्टडी टूरचे आयोजन डॉ.व्ही.आर.गुंजाळ, प्रा.एन.डी.वळवी, डॉ.यु.जे.सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

**दिनांक- 21 डिसेंबर, 2019:- डिजीटल साक्षरता-ग्रामपंचायत महिलांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चोपडा तालुक्यातील ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी डिजीटल साक्षरता विषयक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. एकुण 50 ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून श्री.भरत कासोदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चोपडा, कार्यक्रमाच्या अध्यक्षा -सौ.पुनमताई गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा प्रमुख पाहूणे म्हणून मा.सौ.अश्विनीताई गुजराथी, जिल्हास्तर सदस्या-जिल्हा कृतीदल, वनस्टॉप सेंटर, जळगांव व सहसचिव, भगिनी मंडळ चोपडा व विशेष उपस्थिती- सौ.छायाबेन गुजराथी उपाअध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा, जि.जळगांव उपस्थित होते.




प्रथम सत्रात मा.श्री.जितेंद्र महाजन व श्री.समाधान कोळी समन्वयक, पंचायत समिती चोपडा यानी ग्रामपंचायतीत डिजिटल साक्षरतेचे महत्व व उपयोग या विषयावर मार्गदर्शन केले, तर दुपारच्या सत्रात मा.मेघना देशमुख व मा.पल्लवी सोमवंशी प्रशिक्षक व सहप्रशिक्षक महाराष्ट्र राज्य, महिला आयोग, यानी डिजिटल साक्षरतेचे महत्व व प्रत्यक्ष उपयोग या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले.

**दिनांक- 27/12/2019 ते 02/01/2020:- राष्ट्रीय सेवा योजना ग्रामिण शिबीर- माचले, ता. चोपडा**

समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांचे ग्रामीण शिबीर माचले ता. चोपडा येथे घेण्यात आले. शिबीराचे उद्घाटन प्रेरणा मतिमंद विद्यालय चोपडा येथील विद्यार्थी बागवान शाहीद हारुन याच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ.पुनमताई गुजराथी, प्रमुख पाहुणे म्हणून सौ.छायाबेन गुजराथी व जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.विजय मांटे उपस्थित होते. दि.27 ते 02 जानेवारी,2020 या कालावधीत विविध विषयांवरील व्याख्यानांचे



आयोजन करण्यात आले होते. यात 1)सामाजिक न्याय विभागातील विविध योजनांची माहिती घेण्यात आली.2)ग्रामस्वच्छता अभियान 3)श्रमसंस्कार 4) बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान इ. कार्यक्रम घेण्यात आले. यासाठी डॉ.मोहिनी उपासनी, कार्यक्रम अधिकारी व डॉ.राहुल निकम, सहा.महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहिले.

**दिनांक-03 जानेवारी, 2020:- सावित्रीबाई फुले जयंती**




समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथील विद्यार्थी विकास विभागामार्फत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात डॉ.संबोधी देशपांडे, विद्यार्थी विकास अधिकारी, यांनी सावित्रीबाईंच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक-11 ते 12 जानेवारी, 2020:- आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळा-**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, विद्यार्थी विकास विभाग यांच्यामार्फत आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळेचे आयोजन क ला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे येथे दि.11 ते 12 जानेवारी, 2020 या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत आमच्या महाविद्यालयातील खालिल विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

1) पावरा योगिता रेलसिंग- MSW-I
2) पवार पुनम चंद्रसिंग- MSW-I
3) भादले कविता मोतिलाल- MSW-I
4) पावरा अजय रतिलाल- MSW-I
5) वळवी सचिन अमरसिंग- SYBSW
6) पावरा रुपसिंग संकऱ्या- SYBSW

**दिनांक-10 जानेवारी, 2020:- Gest Lecture**




समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे दिनांक-10 जानेवारी, 2020 रोजी सकाळी गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले होते. गेस्ट लेक्चरर म्हणून 1) Simmi Benbansi & 2) Shwta Jadhav- Associate, CASI, New york, उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना Importance of Value Add Programs Career Guidance and Profile Building. या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## दिनांक-16 ते 20 जानेवारी, 2020:- युवक महोत्सव-2020

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आयोजित
युवक महोत्सव-2019-20 चे आयोजन पू.सा.गु.वि.प्र.मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शहादा येथे दिनांक-16 ते 20 जानेवारी, 2020 या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या युवक महोत्सवात महोत्सवात खालिल नामनिर्देशीत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे.




1) महाजन शिवानी राजेंद्र- MSW-I
   कविता वाचन
2) पटले निकीता प्रकाश- MSW-I - वाद-विवाद
3) पावरा हिना सुकलाल-MSW-I- रांगोळी
4) पावरा योगिता रेलसिंग - MSW-I मेहंदी
5) बागुल किरण अरुण - MSW-II मिमिक्री

संघ व्यवस्थापक म्हणून डॉ.संबोधी देशपांडे यांनी काम पाहिले.

## दिनांक-25 जानेवारी, 2020:- प.पु.बाबाजी स्मृती प्रित्यर्थ आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा



समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे प.पु.बाबाजी स्मृती प्रित्यर्थ आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन कण्यत आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.प्रा.एस.टी. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सौ.पुनम गुजराथी व प्रमुख पाहूणे म्हणून सौ.उर्मिला गुजराथी व सौ.अश्विनी गुजराथी संस्थेचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण 17 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत

प्रथम- पाटील नमिता सुनिल    द्वितीय- सोनार निर्भया धनंजय    तृतीय- कोळी रोशनी ईश्वर

उत्तेजनार्थ- धनगर उज्वला लिलाधर, शिंपी हर्षल दगडू

## दिनांक- 5 फेब्रुवारी, 2020:- युवती सभा-व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा



समाजकार्य महाविद्यालयात दि.05/02/2020 रोजी युवती सभे अंतर्गत-व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.प्रा.डॉ.रश्मी शर्मा,पी.ओ. नाहटा कॉलेज, भुसावळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून सौ.पुनमताई गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा, तर

प्रमुख अतिथी म्हणून सौ.छायाबेन गुजराथी, सौ.अश्विनीताई गुजराथी या उपस्थित होत्या या कार्यक्रमात विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते त्यात

1) प्रा.डॉ.रश्मी शर्मा-पी.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ- युवतींचे स्व-संरक्षण

2) डॉ.प्राजक्ता भामरे- भामरे हॉस्पिटल, चोपडा युवतींचे आरोग्य

3) प्राचार्य सुचित्रा वैद्य- डी.एड.महाविद्यालय बोराडी- युवतींचा व्यक्तीमत्व विकास

4) प्रा.सविता जाधव- शिक्षशास्त्र महाविद्यालय चोपडा, - स्त्री-पुरष समानता

पढाओ इ.विषयांवरील मान्यवरांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमास 110 विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

**दिनांक- 06 ते 13 फेब्रुवारी, 2020:- स्वयंसिध्दा अभियान**



विद्यार्थीनींचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे स्वयंसिध्दा अभियान सुरु करण्यात आले आहे. समाजकार्य महाविद्यालयातर्फे दिनांक- 06 ते 13 फेबुंवारी, 2020 या कालावधीत स्वयंसिध्दा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानात विद्यार्थीनींना स्व-संरक्षणासाठी ज्युदो-कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले. कराटे प्रशिक्षक श्री.विजय पं.पाटील व श्री गोंविंद कचरु खजुरे यांनी विद्यार्थीनींना प्रशिक्षण दिले. या अभियानात 50 विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. अभियानाचे उद्‌घाटन संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनमताई गुजराथी यांनी केले, तर प्रमुख पाहूणे म्हणून सौ अश्विनीताई गुजराथी व महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक-08 फेब्रुवारी, 2020- कायदा आणि कायद्याची उपयुक्तता या विषयावर व्याख्यान**



नेहरु युवा केद्र जळगांव आणि खान्देश परिसर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कायद आणि कायद्याची उपयुक्तता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. वक्ते म्हणून ॲड.श्री.अविनाश पाटील यांना आमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ.विद्याताई सोनार, महिला बाल कल्याप विभाग या उपस्थित होत्या. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक:-15 फेब्रुवारी,2020- राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान-एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजन-**

समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे,Women Contribution in National Development या विषयावर

एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ.पुनम गुजराथी, अध्यक्षा भगिनी मंडळ, या उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाचे उद्‌घाटन डॉ.पी.पी.माहूलीकर, प्र.कुलगुरु,उमवि जळगांव यांच्या हस्ते करण्यात आले. बिजभाषक म्हणून डॉ.मिना



कुंटे, माजी कुलसचिव तथा प्राचर्य एस.एन.डी.टी.महिला महाविद्यालय यांना आमंत्रीत केले होते. प्रमुख अतिथी म्हणून सा.छायाबेन गुजराथी, सौ.मिना गुजराथी उपस्थित होत्या या राष्ट्रीय परिषदेत एकूण 79 शिक्षकांनी सहभाग घेतला होता तर 64 संशोधन पेपर सादर करण्यात आले. या परिषदेचे समन्वयक म्हणून प्रा.ज्ञानेश्वर भागवत, डॉ.संबोधी देशपांडे व डॉ.मोहिनी उपासनी यांनी काम पाहिले.

**दिनांकः-17 फेब्रुवारी,2020 - महाविद्यालयीन (C.A.Internal Exam) आयोजन-**

**दिनांकः-27 फेब्रुवारी, 2020- वनाधिकार प्रशिक्षण शिबीर**

वनांचल समृध्दी अभियानांतर्गत सामुहीक वनाधिकार प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले. यात बारीपाडा या गावाच्या विकासावर आधारीत चित्रफित दाखविण्यात आली. सामुहीक वनहक्क कायदा अधिकार यावर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणाच्या व मनरेगाच्या माध्यमातून आदिवासींना रोजगार




उपलब्ध व्हावा, या प्रशिक्षणासाठी 15 गावातील आदिवासी उपस्थित होते. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथील समन्वयक प्रा.स्वनील चौधरी, वार्ताहर श्रीकांत नेवे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांकः-13 मार्च, 2020- वृक्ष वाचवा मोहिमेचा प्रारंभ/ वृक्ष जगवा कार्यशाळा**

समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना मार्फत वृक्ष जगवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात फेकुन दिलेल्या पाण्याच्या प्लॉस्टिकच्या बाटल्यांचा पुर्नवापर करुन वृक्षाना पाणी देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. या बाटलीच्या झाकणाला झाडाच्या मुळाशी सदर बाटली उताराच्या



दिशेने ठेवावी. ही बाटली हळू-हळू- 3 ते 4 दिवसापर्यंत झाडाला पाणी पुरवीते. त्यामुळे परीसरातील झाडे

जगतील. यासाठी श्री प्रमोद वैद्य यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमास श्री.वसंत गुजराथी, श्री.आशिषभाई गुजराथी, सौ.अश्विनीताई गुजराथी, डॉ.किशोर पाठक उपस्थित होते.

**दिनांकः-8 व 9 मे, 2020- राज्यस्तरीय ऑनलाईन बेबीनार/कार्यशाळा (शिक्षकांसाठी)**

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स आणि भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने Social Work Intervention in Corona Pandemic crisis, Challenges and Roll या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे/ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबीनारचे उद्घाटक म्हणून डॉ.पी.पी.माहुलीकर, प्र.कुलगुरु, कबचौ,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव हे होते. तर वक्ते म्हणून डॉ.अंबादास मोहिते, (संस्थपक अध्यक्ष, मास्वे), डॉ.विजय शिंगणापुरे, (सदस्य, मास्वे), डॉ.दिपक वलोकार, (संचालक, कर्वे समाजसेवा संस्था) डॉ.स्वाती धर्माधिकारी (सदस्या, मास्वे) हे होते.

**दिनांकः-14 व 15 मे, 2020- राज्यस्तरीय ऑनलाईन बेबीनार/कार्यशाळा (विद्यार्थ्यांसाठी)**

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स आणि भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने Roll of youth in Corona Pandemic crisis या विषयावर विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे/ऑनलाईन वेबीनारचे आयोज्न करण्यात आले होते. या वेबीनारचे उद्घाटक म्हणून डॉ.प्रमोद पवार, अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा, कबचौ,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.आशिषभाई गुजराथी हे होते. तर वक्ते म्हणून सौ.ज्योती मोहिते,(समन्वयक, नेहरु युवा केंद्र, अमरावती) तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अंबादास मोहिते, (संस्थपक अध्यक्ष, मास्वे), डॉ.विजय शिंगणापुरे, (सदस्य, मास्वे), डॉ.दिपक वलोकार, (संचालक, कर्वे समाजसेवा संस्था) हे होते.




महाराष्ट्र राज्य महिला आयोग आयोजित चोपडा तालुक्यातील ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी डिजीटल साक्षरता प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करीत असतांन मा.श्री.भरत कोसोदे गटविकास अधिकारी, पंचायत समिती चोपडा, सोबत संस्थेच्या अध्यक्ष मा.पुनमबेन गुजराथी व इतर मान्यवर

महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करीत असतांना मा.अरुणभाई गुजराथी, श्री.जीवनभाऊ चौधरी, वनविभागाचे वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी






महाविद्यालयात शिक्षक दिनी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा पुरस्काराचे वितरण करीत असतांना मा.श्री.सुधाकर केंगे (निवृत्त मुख्याध्यापक तथा कार्यवाहक, विवेकानंद विद्यालय चोपडा) सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक.

महाराष्ट्रात सांगली, सातारा, कोल्हापुर येथे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पुरग्रस्तांना मदत म्हणून महाविद्यालयाकडून मदत पथकाची टिम पाठवित असतांना.



राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान या एकदिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी मा.डॉ.पी.पी.माहूलीकर, प्र.कुलगुरु,कबचौउमवि,जळगांव तसेच संस्थेच्या अध्यक्षा,मा.सौ.पुनम गुजराथी व इतर मान्यवर....






चोपडा तालुक्यात महाराष्ट्र राज्य समाज कल्याण विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व प्रचार प्रसार होण्यासाठी डिजीटल स्क्रिनचा रथ महाविद्यालयात आला असता त्याची माहिती घेत असतांना महाविद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारी

**Teachers Details:**

| Teachers | SC | | ST | | VJ/DT | | PH | | SBC | | OBC | | OPEN | | NT-2 | | NT-3 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F |
| Full Time | 3 | - | 1 | - | - | - | - | - | - | - | 3 | - | 2 | 2 | - | - | 1 | - |
| Part Time | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | - | - |
| Total | 3 | - | 1 | - | - | - | - | - | - | - | 3 | - | 2 | 3 | - | - | 1 | - |

**Student Details:**

| Student Strength | | | No.of NSS Students | No.of NCC Students | No.of Students Receving Freeship/Scholarship | Placements | NET/SET/GATE/GPAT Qualified Student |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PG | UG | Total | | | | | |
| 150 | 124 | 274 | 100 | 0 | 168 | 5 | 0 |

**STUDENT'S ENROLMENT**

NAME OF COLLEGE- **BMC'S,COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA, DIST-JALGAON** COLLEGE CODE-140052

FACULTY AND COURSE - **MM&SS- B.S.W. & M.S.W.** *YEAR-2019-20*

| YEAR | INTAKE CAPACITY | SC | | ST | | VJ/DT | | NT-B | | NT-C | | NT-D | | SBC | | OBC | | OPEN | | TOTAL | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| U.G. | | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| FIRST YEAR | 44 | 3 | 1 | 5 | 9 | 0 | 0 | 3 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 2 | 8 | 5 | 2 | 3 | 23 | 21 | **44** |
| SECOND YEAR | 40 | 2 | 2 | 5 | 8 | | | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 1 | 8 | 6 | 1 | 1 | 19 | 20 | **39** |
| THIRD YEAR | 40 | 7 | 3 | 4 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 12 | 3 | 1 | 0 | 29 | 8 | **37** |
| **TOTAL** | **124** | **12** | **6** | **14** | **18** | **0** | **0** | **6** | **0** | **3** | **3** | **0** | **0** | **4** | **4** | **28** | **14** | **4** | **4** | **71** | **49** | **120** |
| **P.G.** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| FIRST YEAR | 80 | 7 | 3 | 9 | 17 | 1 | 0 | 0 | 1 | 7 | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 12 | 12 | 1 | 1 | 37 | 39 | **76** |
| SECOND YEAR | 72 | 6 | 4 | 8 | 10 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 1 | 0 | 0 | 4 | 1 | 11 | 15 | 7 | 1 | 39 | 33 | **72** |
| **TOTAL** | **152** | **13** | **7** | **17** | **27** | **1** | **0** | **0** | **2** | **10** | **4** | **0** | **0** | **4** | **3** | **23** | **27** | **8** | **2** | **76** | **72** | **148** |
| **GRANT TOTAL** | **276** | **25** | **13** | **31** | **45** | **1** | **0** | **6** | **2** | **13** | **7** | **0** | **0** | **8** | **7** | **51** | **41** | **12** | **6** | **147** | **121** | **268** |
| **Full TimeTeachers** | **17** | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 3 | 2 | 10 | 2 | **12** |
| **Part time Teachers** | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | **1** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **No of foreign Sdudents - MALE-0** | **FEMALE-0** | | **TOTAL-0** | |
| **Grant Total- MALE-** | **147** | **FEMALE-** | **121** | **TOTAL- 268** |

**Students coming from families with income below the poverty line -2019-20**

| Class | S.C.( G.O.I.) | | SC Freeship | | SBC GOI | | SBC Freeship | | OBC GOI | | OBC Freeship | | NT GOI | | NT Freeship | | ST GOI | | ST Freeship | | Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F |
| **FYBSW** | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 4 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | 0 | 0 | 10 | 9 |
| **SYBSW** | 0 | 2 | 1 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 5 | 3 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 6 | 0 | 0 | 12 | 14 |
| **TYBSW** | 3 | 3 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 11 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 17 | 7 |
| **MSW -I** | 6 | 2 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 5 | 9 | 0 | 1 | 7 | 4 | 0 | 0 | 4 | 15 | 1 | 0 | 23 | 33 |
| **MSW -II** | 6 | 3 | 0 | 0 | 3 | 1 | 0 | 0 | 10 | 14 | 0 | 0 | 2 | 2 | 0 | 1 | 5 | 6 | 0 | 0 | 26 | 27 |
| Total | **18** | **10** | **2** | **0** | **5** | **6** | **0** | **0** | **34** | **32** | **0** | **2** | **14** | **8** | **1** | **1** | **13** | **31** | **1** | **0** | **88** | **90** |
| | 28 | | 2 | | 11 | | 0 | | 66 | | 2 | | 22 | | 2 | | 44 | | *GOI* | | **84** | **87** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | *Freeship* | | **4** | **3** |

**महाविद्यालयात प्रवेशीत विद्यार्थी व उत्तीर्ण झालेले विद्यार्थी संख्या आणि टक्केवारी दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | प्रवेशीत वर्ग | प्रवेशीत विद्यार्थी | | | परीक्षेसाठी बसलेले विद्यार्थी | | | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | Total | M | F | Total | M | F | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 2019-20 | F.Y.B.S.W. | 23 | 21 | **44** | 23 | 20 | **43** | 23 | 20 | **43** | **100.00** |
| | S.Y.B.S.W. | 19 | 20 | **39** | 18 | 20 | **38** | 17 | 20 | **37** | **97.37** |
| | T.Y.B.S.W. | 29 | 8 | **37** | 28 | 8 | **36** | 24 | 7 | **31** | **86.11** |
| | **Total** | **71** | **49** | **120** | **69** | **48** | **117** | **64** | **47** | **111** | **94.87** |
| | M.S.W.-I | 37 | 39 | **76** | 34 | 38 | **72** | 30 | 38 | **68** | **94.44** |
| | M.S.W.-II | 39 | 33 | **72** | 38 | 33 | **71** | 35 | 30 | **65** | **91.55** |
| | **Total** | **76** | **72** | **148** | **72** | **71** | **143** | **65** | **68** | **133** | **93.01** |
| | **Grand Total** | **147** | **121** | **268** | **141** | **119** | **260** | **129** | **115** | **244** | **93.85** |

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)**
**Jalgaon-425001, Maharashtra, (India)**

**Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019**

| Journal Publications Detail | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Teacher** | **Type of Publication** | **No. of National Research Publication / Article** | **No. of International Research Publication / Article** | **Impact Factor** |
| 1 | Dr.Anant V. Deshmukh | | 3 | 1 | 6.251 |
| 2 | Prof.Ashish S.Gujarathi | | 1 | 3 | 6.261 |
| 3 | Dr.Vinod A. Raipure | | 2 | 0 | 6.371 |
| 4 | Dr.Sambodhi M. Deshpande | | 0 | 1 | 6.261 |
| 5 | Dr.Maroti N. Gaikwad | | 3 | 0 | 6.261 |
| 6 | Prof.Kalpana S. Sonawane | | 0 | 4 | 6.261 |
| 7 | Dr.Mohini U.Upasani | | 0 | 2 | 6.261 |

**Signature of Principal/Director/Head**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)**
**Jalgaon-425001, Maharashtra, (India)**

**Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019**

| Course Detail | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Program / Course Name** | **Intake Capacity** | **Application Received** | **Students Admitted** | **No. of Seats embarked for Reserved Category** | **Course Level** |
| 1 | B.S.W. | 40 | 94 | 44 | 21 | Under Graduate |
| 2 | M.S.W. | 60 | 153 | 80 | 31 | Post Graduate |

**Signature of Principal/Director/Head**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)
Jalgaon-425001, Maharashtra, (India)

Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019

| Placement Information | | | |
|---|---|---|---|
| Sr. No. | Student Name | Organization/ Company Name | Annual Salary Offered i in Rs. (Format:- 99,99,999 ) |
| 1 | Patil Urmila Sunil | SPARC, Pune | 22000 |
| 2 | Suryawanshi Bharti Dhanraj | SPARC, Pune | 22000 |
| 3 | Sarwan Nita Ramu | SPARC, Pune | 22000 |
| 4 | Patil Shweta Subhash | SPARC, Pune | 22000 |
| 5 | Puranik Shipad Suhas | SPARC, Pune | 22000 |

Signature of Principal/Director/Head

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)
Jalgaon-425001, Maharashtra, (India)

Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019

| Library Information | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Number of Text Book Titles | Number of Text Books Volumes | Number of Reference Book Titles | Number of Reference Book Volumes | Name of Software used for Library |
| 1 | 2553 | 6555 | 219 | 266 | Vriddhi Software |

Signature of Principal/Director/Head

Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019

**MoU Detail**

| Sr. No. | Name of Institute / Orgnization with whom MoU has been done | Address of Organization | Objective/Purpose | Date of Collaboration | Duration | Out Come (if any) |
|---|---|---|---|---|---|---|

**Collaboration Detail**

| Sr. No. | Name of Institute / Orgnization with whom collaboration has been done | Address of Organization | Objective/Purpose | Date of Collaboration | Duration | Out Come (if any) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Seva Sahayog Foundetion | Pune | Distribution of School Bag & Kit to Poor School Student | 05/07/2018 | 05 July, 2018 | MSW-II Year Student Field Work |
| 2 | Civil Hospital | Chopda | Helth Camp & Awareness | 24/06/2018 | 24 June, 2018 | Awareness peoples-Social Work |
| 3 | Rotary Club | Chopda | Awareness Tobaco | 18/07/2018 | 18 JUly, 2018 | Awareness |
| 4 | Tahasil Office, | Chopda | Awareness to Student for Voting | 18/09/2018 | 18 Sept, 2018 | Voting Awareness |
| 5 | Nagar Parishad | Chopda | Awareness form Govar & Rubela | 01/10/2018 | 01 Octo,2018 | Awareness |
| 6 | Maharashtrarajya Mahila Ayog | Mumbai | Training for Self-Help-Group Women | 19/10/2018 | 2 day | Training |
| 7 | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University | Jalgaon | Education and opportunity International Workshop | 09/03/2019 | 09 March, 2019 | For Teachers |

**Linkages Detail**

| Sr. No. | Name of Institute / Orgnization with whom Linkages has been done | Address of Organization | Objective/Purpose | Date of Linkages | Duration | Out Come (if any) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Information Library Netwaork N-List | Ahamadabad | For Online Books to College Student and Faculties | 01/06/2014 | One Y | For Faculties and Students |

Signature of Principal/Director/Head

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)**
**Jalgaon-425001, Maharashtra, (India)**

**Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019**

| Events Orgnized (Curricular/Co-Curricular/Extra Curricular) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Event Type** | **Event Name** | **Funding Agency** | **No.** | **Duration** |
| 1 | Curricular | डेंग्यू,ताप,मलेरीया जनजागृतीपर कार्यशाळ | उपमलेरीया पथक,चोपडा | 170 | 10 June, 2018 |
| 2 | Curricular | तंबाखू मुक्त जनजागृती अभियान | रोटरी क्लब चोपडा | 110 | 27 July, 2018 |
| 3 | Curricular | आपत्कालीन समायोजन कार्यशाळा | KBC North Maharashtra University, jalgaon | 139 | 6-8 September, 2018 |
| 4 | Extra-Curricular | गोवर, रुबेला लसीकरण जनजागृती कार्यशाळा | नगर परिषद चोपडा | 105 | 1 October, 2018 |
| 5 | Extra-Curricular | स्वंयसहाय्यता बचत गटातील मीहलांन प्रशिक्षण | महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई | 117 | 19-20 October, 2018 |
| 6 | Curricular | Village Camp | Self | 130 | 12-18 December,2018 |
| 7 | Curricular | Yuvati Sabha | KBCNMU, Jalgaon | 70 | 29 January,2019 |
| 8 | Curricular | स्वंयिसध्दा अभियान | KBCNMU, Jalgaon | 50 | 30 January to 4 Februa 2019 |
| 9 | Extra-Curricular | आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा | College of Social Work,Chopda | 220 | 14 Feb, 2019 |
| 10 | Extra-Curricular | शिक्षण आणि संधी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा | KBCNMU, Jalgaon | 106 | 9 March, 2019 |

**Signature of Principal/Director/Head**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)**
**Jalgaon-425001, Maharashtra, (India)**

**Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019**

| Sponsored Project Detail | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Project Title** | **Principal Investigator Name** | **Co-Investigator Name** | **Funding Agency** | **Durati on** | **Amo unt** |
| 1 | Small Research Project "To study the present situation and impact of swachha Bharat Abhiyan | Dr.Rahul Nikam | - | National Council of Rural Institutes (NCRI) | 2 Month | 4000 0 |
| 2 | To study the impact of Mahatma Gandhi National Rural Employment Grantee Scheme (MGNREGS) on Generating Rural Livelihood In Jalgaon District (Maharashtra) | Dr. Maroti N. Gaikwad | - | ICSSR, New Delhi | One Year | 2000 00 |

**Signature of Principal/Director/Head**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)**
**Jalgaon-425001, Maharashtra, (India)**

**Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019**

| Conference proceedings | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Teacher Name** | **No. of National Research Papers Published** | **No. of International Research Papers Published** |
| 1 | Dr.Anant V. Deshmukh | 1 | 1 |
| 2 | Prof.Ashish S.Gujarathi | 1 | 1 |
| 3 | Dr.Vinod A. Raipure | 0 | 1 |
| 4 | Prof. Shailesh B. Patil | 1 | 1 |
| 5 | Dr.Rahul Y. Nikam | 2 | 0 |
| 6 | Dr.Sambodhi M. Deshpande | 0 | 1 |
| 7 | Dr.Maroti N. Gaikwad | 1 | 0 |
| 8 | Prof.Kalpana S. Sonawane | 1 | 0 |
| 9 | Prof.Dnyaneshwar G. Bhagwat | 0 | 1 |

**Signature of Principal/Director/Head**

Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019

| Books / Monographs Published by Teachers | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Teacher Name | Name of the Book/Monograph | Month & Year of Publication | Publisher Name | Assistance Received From Agency (if any) | Assistance Detail |
| 1 | Dr.Anant V. Deshmukh | Education and Opportunity | March-2019 | Prashant Publication, Jalgaon | N | |
| 2 | Prof.Ashish S.Gujarathi | Education and Opportunity | May-2019 | Prashant Publication, Jalgaon | N | |
| 3 | Dr.Mohini U. Upasani | कामगारांची कार्यस्थीती आणि कार्यसमाधानता | March-2019 | Atharva Pablication, Dhule | N | |
| 4 | Prof.Narsing D. Valvi | Education and Opportunity | March-2019 | Prashant Publication, Jalgaon | N | |
| 5 | Prof.Shailesh B. Patil | Education and Opportunity | March-2019 | Prashant Publication, Jalgaon | N | |
| 6 | Dr.Rahul Y. Nikam | व्यक्तीसह-कार्य (Working With Indivisal) | March-2019 | Prashant Publication, Jalgaon | N | |
| 7 | Dr.Sambodhi M. Deshpande | महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना आणि अनुसूचित जातींच्या मजूरांची स्थिती | January-2019 | स्वयदीप प्रकाशन, पुणे | N | |
| 8 | Dr.Maroti N. Gaikwad | Development, Displacement and Rehabilitation Experience of Nanded city in India | December-2018 | LAP LAMBERT Academic Publishing Germany | N | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | Prof.Kalpana S. Sonawane | Library and Information Science Valum-I) Information Science II) Library Movement and Legislation III) Information Sources | January-2019 | Prashant Publication, Jalgaon | N |
| 10 | Prof.Kalpana S. Sonawane | and Information Science Valum-IV) Library Services V) Knowledge Management VI)Library Management VII)Information Technoogy | January-2019 | Prashant Publication, Jalgaon | N |
| 11 | Prof.Kalpana S. Sonawane | Library and Information Science Valum-VIII) Library Automation IX) Research Methodology X)Knowledge Resources Centers | January-2019 | Prashant Publication, Jalgaon | N |

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)
Jalgaon-425001, Maharashtra, (India)

Annual Report information for the period of 1st July, 2018 to 30th June, 2019

## Award recieved and NET/SET/GATE/GPAT Qualified Students Information

| Awards recieved by Students | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Award Type | Event Type | Student Name | Event Detail | Month & Year of Award recieved |
| 1 | Sports | University Level Award | Mali Digambar Dayaram | Body Building 65 KG | October 2018 |
| 2 | Youth Festival | University Level Award | Chaudhari Sapana Pralhad | University Level Youth Festival- First Award, At-Arts, Commerce & Science College Chalisgaon | January 2019 |

Signature of Principal/Director/Head

**Principal**
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work.Chopda

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

BMC's, College of Social Work,Chopda IQAC